दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०१ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १३२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## नेपाळमध्ये महापुर; अनोळखीची हाक ठरली जीवनदायी, 370 विद्यार्थी-शिक्षक बचावले

**इंफाळ :** नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरादरम्यान एका अनोळखी व्यक्तीच्या प्रसंगावधानामुळे तब्बल ३७० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्राण वाचले. पुराचे पाणी वेगाने येत असल्याचे लक्षात येताच या व्यक्तीने धावत शाळेजवळ जाऊन विद्यार्थ्यांना तातडीने सुरक्षित ठिकाणी जाण्याचा इशारा दिला. त्याच्या वेळीच मिळालेल्या इशाऱ्यामुळे मोठी दुर्घटना टळली. ही घटना नेपाळमधील बेट्रावती परिसरातील उत्तरगया पब्लिक स्कूलमध्ये घडली.

## 'फक्त शाश्वत ऊर्जा पुरेशी नाही'; एलॉन मस्क यांचा मोठा इशारा

**टोकीयो :** टेस्ला आणि स्पेसएक्सचे प्रमुख एलॉन मस्क यांनी पृथ्वीच्या दीर्घकालीन भवितव्याबाबत महत्त्वाचा इशारा दिला आहे. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी केवळ शाश्वत ऊर्जेकडे वळणे पुरेसे ठरणार नसून, भविष्यात पृथ्वीचे तापमान नियंत्रित करण्यासाठी अंतराळातील प्रगत तंत्रज्ञान आणि मोठ्या प्रमाणावरील भू-अभियांत्रिकीची गरज भासेल, असे त्यांनी म्हटले आहे. एलॉन मस्क यांनी अशी संकल्पना मांडली की, भविष्यात चंद्रावर उभारलेल्या 'मास ड्रायव्हर्स'च्या मदतीने पृथ्वी-सूर्य लॅग्रेंज बिंदूवर विशेष उपग्रह प्रक्षेपित केले जाऊ शकतात.

# क्रीडा संकुलासह औद्योगिक वसाहतीचा विकास करू
## परभणीच्या संवाद सभेमध्ये उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

परभणी परभणीत क्रीडा संकुलासह नवीन औद्योगिक वसाहत विविध सुविधा सहदेऊ व परभणीचा नाविन्यपूर्ण विकास करू उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध संघटनाच्या शिष्टमंडळाची थेट संवाद साधताना असे आश्वासन दिले.

परभणीत अनेक कार्यक्रम झाले परंतु असा असा प्रथमच थेट संवाद विविध संघटनाशी संवाद मेळावा अक्षदा मंगल कार्यालयात दिनांक 30 ऑगस्ट रोजी रविवारी खासदार संजय जाधव यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता यावेळी व्यासपीठावर खासदार संजय जाधव आमदार सईद खान जिल्हाप्रमुख आनंद भरोसे जिल्हाप्रमुख विशाल कदम युवा सेना जिल्हाप्रमुख अप्पाराव वावरे माजी जिल्हाप्रमुख गंगाप्रसाद आणि राव माजी महापौर प्रताप देशमुख संपर्कप्रमुख आनंद जाधव माजी महानगरप्रमुख प्रवीण देशमुख माणिक पोंढे सह आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी विविध भागातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी नागरिक आधी संघटनेने मागण्याचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले त्यातच काही प्राथमिक स्वरूपातील मागण्या मोठ्या प्रतिनिधी आपल्या निवेदनात उप मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. त्यामध्ये सीए संघटनेचे अध्यक्ष श्याम झोप यांनी परभणी येथे



नवीन एमआयडीसीची व खाजगी उद्योजकांना इन्फ्रास्ट्रक्चर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली व क्रीडा संकुल साठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली तालुका क्रीडा संकुल निधी अशी मागणी क्रीडा संघटनेचे माधव शेजुळ यांनी केली परभणी जिल्ह्यात एक ते दोन लाख बेरोजगार करून नोकरीसाठी पुणे मुंबई येथे स्थलांतरित होतात त्यांना जिल्ह्यातच रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी पूर्णा येथील उद्योजक संतोष एकलारे यांनी केली यांनी यामध्ये गंगाखेड येथील मोसी कॉल या कारखान्याचे 25 एकर जागा पडून असून या जागेवर प्रकल्प उभारणी करण्याची मागणी प्रशांत फड यांनी केली परभणीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी शहरात विविध ठिकाणी येणाऱ्या पालकांसाठी पालखीचा मार्ग उभारणी करावी याबाबत बायपास मार्गासाठी नवीन जमीन संपादित करून द्यावी अशी मागणी कर सल्लागार एडवोकेट सुभाष इंगळे यांनी केली जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांना कायम केल्याबद्दल बांगर या महिलेने उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले त्यामध्ये अंगणवाडीचे किचकट प्रश्न व त्यांच्या मानधनाचा प्रश्न मानधन सहा हजाराहून पंधरा हजार रुपये करण्याची मागणी अंगणवाडी सेविकांनी केली विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्ती केंद्र स्थापन परभणीत करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली यामध्ये शहरातील अनेक प्रश्न त्यापैकी व्यापारी संकुल उभे करणे भूमिगत गणेश आणि रस्त्याच्या मागणीच्या सूचना दिल्या खड्डे मुक्त आणि धूळ मुक्त शहर करण्यासाठी नगर विकास खात्यातर्फे निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी समस्त परभणीकरांकडून करण्यात आली.

एमआयडीसीसाठी उद्योग मंत्री अशी फोनवर चर्चा करून परभणीत नवीन एमआयडीसीचे आणि खाजगी उद्योगासाठी उपासकच्या उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्वरित उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी फोनवर चर्चा करून तात्काळ आठ दिवसात पाहणी करून एमआयडीसी चा प्रश्न तात्काळ मिटवण्याचे सांगितले.

## थोडक्यात वार्ता

### 'भटके विमुक्त दिनानिमित्त' आज विशेष व्याख्यान

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'भटके विमुक्त दिनानिमित्त' उद्या, मंगळवारी (दि. १ सप्टेंबर) विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय भटके विमुक्त जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष तथा पद्मश्री भिकू रामजी इदाते हे या कार्यक्रमात 'ग्रामीण विकासासाठी भटक्या विमुक्तांचे योगदान' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेच्या (जीएमएनआरडी) वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे. विद्यापीठाच्या महात्मा फुले सभागृहात मंगळवारी सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते भूषवणार असून, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्यंकटेश लांब आणि भटके विमुक्त विकास परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय पुरी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. भटके विमुक्त जमातींच्या विकासाचा व योगदानाचा वेध घेणाऱ्या या महत्त्वपूर्ण व्याख्यानाला अधिकाधिक संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर आणि संस्थेचे संचालक डॉ. संग्राम गुंजाळ यांनी केले आहे.

### मुदत संपलेल्या 'फूड पॅकेट्स'ची तारीख बदलून विक्री

**मुंबई :** अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगवरील एक्सपायरी डेट बदलून ते पुन्हा बाजारात विकणारे एक मोठे रॅकेट नवी मुंबईतील तुर्भे येथे उघडकीस आले आहे. अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत तब्बल ७५ लाखांहून अधिक किमतीचा मुदतबाह्य साठा जप्त केला असून, याप्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, तुर्भे येथील टीटीसी इंडस्ट्रियल एरियामधील प्लॉट नंबर सी-४४९ वर असलेल्या 'साधना एंटरप्रायझेस' या आस्थापनेवर संयुक्त पथकाने छापा टाकला. जयप्रकाश संचूरीराम सिंग आणि जया नवरंग बहादूर सिंग यांच्या मालकीच्या या गोदामात नामांकित कंपन्यांच्या खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये फेरफार केले जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. येथे विविध नामवंत कंपन्यांचे खाद्यपदार्थ साठवून त्यांची अनधिकृतरीत्या रिपॅकिंग आणि लेबलिंग करण्याचे काम सुरू होते. यामध्ये प्रामुख्याने उत्पादनाच्या मूळ पॅकेजिंगवरील तारीख व एक्सपायरी डेट पुसून त्यावर नवीन तारीख छापली जात होती. तसेच काही पदार्थांच्या मूळ घटकांवर आणि न्यूट्रिशिअन माहितीवर नवीन स्टिकर लावून ते पुन्हा बाजारात विक्रीसाठी पाठवले जात असल्याचे उघडकीस आले.

### राज्यातील विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

**मुंबई :** विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदार याद्या सोमवारी प्रसिद्ध करण्यात आल्या. एसआयआर मोहिमेपूर्वी राज्यात एकूण ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार होते. मात्र, गणना प्रपत्र प्राप्त न झाल्यामुळे किंवा विहित कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे यातील २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७, म्हणजेच सुमारे २१.१४ टक्के मतदारांची नावे सध्याच्या प्रारूप यादीतून बाजूला ठेवण्यात आली आहेत. परिणामी, आता प्रारूप यादीत ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ मतदार समाविष्ट असून, यामध्ये ३ कोटी ९५ लाख ८९ हजार ९०५ पुरुष, ३ कोटी ७५ लाख ७२ हजार ५७० महिला आणि ३ हजार ८७ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. जुन्या मतदार यादीतील तब्बल दोन कोटींहून अधिक मतदारांचा समावेश प्रारूप यादीत न होण्यामागे प्रामुख्याने काही महत्त्वाची कारणे समोर आली आहेत.

## सोयगाव बोगस रजिस्ट्री प्रकरणात मोठी कारवाई; दुय्यम निबंधक रावळकर निलंबित
### खासदार संदिपान भूमरे यांच्या भूमिकेनंतर नोंदणी विभागाची कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सोयगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नियमबाह्य पद्धतीने दस्तनोंदणी केल्याच्या प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. प्रभारी सह दुय्यम निबंधक तथा कनिष्ठ लिपिक दीपक एच. रावळकर यांना निलंबित करण्यात आले आहे. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबतचा आदेश जारी केला.

तुकडेबंदी कायदा व नोंदणी नियमांचे उल्लंघन, 'एक जिल्हा एक नोंदणी' योजनेच्या नियमांबाहेर जाऊन दस्तनोंदणी करणे तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी परवानगीशिवाय कार्यालय सुरू करून नोंदणी प्रक्रिया राबविणे, असे गंभीर ठपके रावळकर यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. या कारवाईमुळे सोयगावच्या कथित बोगस रजिस्ट्री प्रकरणाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे.

नोंदणी विभागाच्या तपासणी अहवालानुसार, २७ जुलै ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सोयगाव कार्यालयात एकूण २५२ दस्त नोंदणीसाठी स्वीकारण्यात आले. त्यापैकी दोन दस्त कबुलीजबाबासाठी प्रलंबित ठेवण्यात आले, तर २५० दस्तांची नोंदणी पूर्ण करण्यात आली. यामध्ये सोयगाव तालुक्याबाहेरील तब्बल १७२ दस्तांची नोंदणी करण्यात आल्याचे तपासणीत स्पष्ट झाले आहे. यातील एका दस्ताच्या नोंदणीवेळी शासनाचा महसूल बुडाल्याचेही निदर्शनास आले आहे.

सुट्टीच्या दिवशी २०९ दस्तांवर प्रक्रिया

या प्रकरणातील आणखी गंभीर बाब म्हणजे रविवार, ९ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी असतानाही कार्यालय सुरू ठेवण्यात आले. या दिवशी संबंधित अधिकाऱ्याने आय-सरिता प्रणालीवर २०९ दस्तांवरील पंचवा शिक्का पूर्ण करून दस्तनोंदणीची प्रक्रिया केल्याचे नोंदणी विभागाच्या आदेशात नमूद आहे. परवानगीशिवाय सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरू करून नोंदणीची प्रक्रिया राबविणे हे गंभीर प्रशासकीय उल्लंघन मानण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेताना खासदार संदिपान भूमरे यांनी या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. बोगस किंवा नियमबाह्य दस्त तयार करणाऱ्यांवर कारवाई होत असताना ते दस्त अधिकृतरीत्या नोंदविणाऱ्या अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित का केली जात नाही, असा सवाल त्यांनी प्रशासनासमोर उपस्थित केला होता.

दस्तनोंदणी करताना संबंधित अधिकाऱ्याने कायदे व नियमांची पूर्तता तपासणे आवश्यक आहे. नियमबाह्य दस्तांची नोंदणी झाल्यास संबंधित अधिकाऱ्याची भूमिकाही तपासली पाहिजे, अशी भूमिका भूमरे यांनी मांडली होती. त्यानंतर झालेल्या नोंदणी विभागाच्या तपासणीत गंभीर अनियमितता समोर आल्याने रावळकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

## अंबादास दानवेंच्या नेतृत्वात विराट कावड यात्रा; पैठण गेटवर मुस्लिम बांधवांकडून स्वागत



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने सोमवारी छत्रपती संभाजीनगर शहर दुमदुमून गेले. शिवसेना नेते, आमदार तथा माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली क्रांती चौक ते खडकेश्वर मंदिर अशी विराट कावड यात्रा काढण्यात आली. जिल्ह्याच्या विविध भागांतून पवित्र नद्यांचे जल घेऊन आलेल्या हजारो शिवभक्तांनी यात्रेत सहभाग घेत खडकेश्वर येथे भगवान महादेवाचा जलाभिषेक केला.

क्रांती चौकातून सुरू झालेल्या यात्रेत महिला भगव्या पारंपरिक वेशभूषेत, तर पुरुष पांढऱ्या पोशाखात सहभागी झाले होते. हलगी, संबळ, झांज, मृदंग तसेच उज्जैन येथील 'श्री भस्म रमैय्या भक्त मंडळ' आणि 'दिल महाकाल' पथकाच्या वादनामुळे यात्रेला विशेष रंगत आली. वारकरी भजने, अभंग, गवळणी आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दानवेंचा अनवाणी प्रवास

अंबादास दानवे यांनी स्वतः कावड खांद्यावर घेत क्रांती चौक ते खडकेश्वर मंदिर हा संपूर्ण प्रवास अनवाणी पायांनी केला. त्यांच्या या सहभागामुळे शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मार्गावर व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी पुष्पवृष्टी करून यात्रेचे स्वागत केले.

निल्लोड येथील श्री माऊली वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी रास, पावल्या, फुगड्या तसेच भगवान शंकर, वेताळ-भुते आणि संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर आधारित सजीव देखावे सादर केले. विविध महिला भजनी मंडळांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पैठण गेटवर सामाजिक सलोख्याचे दर्शन

कावड यात्रेच्या मार्गावर पैठण गेट परिसरात मुस्लिम बांधवांनी सहभागी भाविकांसाठी पाण्याची व्यवस्था करून यात्रेचे स्वागत केले. या उपक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सामाजिक सौहार्दाचा संदेश देण्यात आला. यात्रेदरम्यान स्वच्छतेचा संदेशही देण्यात आला असून नागरिकांना कचरा न करण्याचे आवाहन करण्यात आले.

यात्रेत शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, राज्य संघटक चेतन कांबळे, सहसंपर्कप्रमुख अनिल चोरडिया, उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, संतोष खेडके, राजू इंगळे, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, मनपा गटनेते गणेश लोखंडे, जिल्हा परिषद गटनेते मनोज पेरे, महिला आघाडी संपर्क संघटक सुनीता आऊलवार, सहसंपर्क संघटक अनिता मंत्री यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, महिला व युवासैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

खडकेश्वर मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर पवित्र जलाने भगवान महादेवाचा जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर आरती करण्यात आली आणि भक्तिमय वातावरणात कावड यात्रेचा समारोप झाला.

## कृषि व जलसंवर्धनातील योगदानाबद्दल माननीय मुख्यमंत्री ना. श्री देवेंद्र फडणवीस यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाची मानद पदवी प्रदान

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी** :-शेती, शाश्वत ग्रामीण विकास, जलसंवर्धन, नवीकरणीय ऊर्जा आणि शेतकरी कल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री ना श्री देवेंद्र फडणवीस यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या वतीने 'डॉक्टर ऑफ सायन्स' (मानद) पदवी प्रदान करण्यात आली.

नागपूर येथील 'रामगिरी' या शासकीय निवासस्थानी आज दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते या मानद पदवीचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले.

शेती क्षेत्राचा विकास, शाश्वत ग्रामीण विकास, जलसंवर्धन, नवीकरणीय ऊर्जा आणि शेतकरी कल्याणासाठी माननीय मुख्यमंत्री ना श्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन विद्यापीठाच्या वतीने ११ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित २७व्या दीक्षांत समारंभात त्यांना मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी प्रदान



करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार आज या पदवीचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले.

माननीय मुख्यमंत्री ना श्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात शेती व शेतकरी विकासासाठी विविध महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले असून, अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. 'स्मार्ट प्रोजेक्ट', 'पोक्रा' तसेच महाराष्ट्र कृषि एआय धोरणाच्या माध्यमातून राज्यातील कृषि क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे 'महाॲग्री एआय पॉलिसी २०२५–२०२९' जाहीर करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

यासोबतच 'जलयुक्त शिवार अभियान', शेतीमालाला हमीभाव व बाजारपेठ उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा आणि सिंचन प्रकल्पांचा विस्तार, जलसंवर्धन, आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अन्नप्रक्रिया व मूल्यसाखळी विकास, बाजारपेठ सुधारणा आणि डिजिटल शेती अशा विविध उपक्रमांद्वारे राज्याच्या कृषि व ग्रामीण विकासाला चालना देण्यात आली आहे.

कृषि, जलव्यवस्थापन आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रातील या योगदानाची दखल घेऊन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने माननीय मुख्यमंत्री ना श्री देवेंद्र फडणवीस यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' (मानद) पदवी प्रदान करून सन्मानित केले.

## TVK च्या राजकीय मोहिमेमुळे काँग्रेस अस्वस्थ

**चेन्नई :** तामिळनाडूत मुख्यमंत्री विजय यांच्या नेतृत्वातल्या सरकारला काँग्रेसचा पाठिंबा आहे. पण सत्ताधारी टीव्हीके पक्षाच्या राजकीय मोहिमेमुळे काँग्रेस अस्वस्थ आहे. तामिळनाडूमध्ये 'विजय फॉर प्राइम मिनिस्टर' (विजय पंतप्रधान व्हावेत) मोहीम सुरू आहे. यामुळे काँग्रेस पक्षात अस्वस्थता पसरली आहे.

आघाडीत राहूनही टीव्हीकेने (TVK) पंतप्रधानपदासाठी राहुल गांधींच्या उमेदवारीला पाठिंबा दिला नाही तर विजय यांच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडावे लागेल, असा इशारा तामिळनाडू



सरकारचे पर्यटनमंत्री आणि काँग्रेस आमदार राजेश कुमार यांनी दिला आहे.

तामिळनाडू सरकारमध्ये सध्या काँग्रेसचे दोन मंत्री आहेत. विजय यांच्या सरकारला काँग्रेसचा पाठिंबा आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्याच मंत्र्याने मुख्य सत्ताधारी पक्ष असलेल्या टीव्हीके विरोधात नाराजी व्यक्त केली आहे.

## नागरिकांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करा: आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांच्या तक्रारी आणि समस्या जाणून घेऊन त्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक झोन कार्यालयात 'सूचनापेटी' आणि 'अभिप्राय रजिस्टर' अनिवार्यपणे ठेवण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी दिले आहेत.आयुक्त येडगे यांनी सोमवारी सकाळी सहाय्यक आयुक्त क्रमांक २ च्या कार्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन विविध विकासकामांचा आणि कार्यालयीन कामकाजाचा आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यादरम्यान नगरसेविका कीर्ती शिंदे, सहाय्यक आयुक्त रमेश मोरे यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

कार्यालयीन कामांची पाहणी करत असताना आयुक्तांनी प्रत्यक्ष नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी जन्म प्रमाणपत्रासाठी आलेल्या एका नागरिकाच्या अर्जावर तातडीने कार्यवाही करत आयुक्तांच्या उपस्थितीतच त्याला जन्म प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले. याशिवाय मालमत्ता कर दुरुस्ती, जन्म-मृत्यू व विवाह



नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण, तसेच छोटे-मोठे अतिक्रमण तातडीने हटवणे यांसारख्या नागरिकांच्या दैनंदिन व महत्त्वाच्या प्रश्नांवर विनाविलंब कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच, निविदा अंतिम झाल्यानंतर संबंधित कार्यादेश (वर्क ऑर्डर) निश्चित कालमर्यादितच जारी करावेत, अशी तकीद अधिकारी व अभियंत्यांना देण्यात आली.

पाणी पुरवठा व पायाभूत प्रकल्पांची पाहणी

कार्यालयीन आढाव्यानंतर आयुक्त येडगे यांनी शहराच्या विविध भागांत सुरू असलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांची पाहणी केली. यात प्रामुख्याने अभिनय टॉकीजजवळ आणि मिसरवाडी, मुकुंदवाडी येथील पाणी पाईपलाईन क्रॉस कनेक्शनचे काम, तसेच चिकलठाणा आठवडी बाजारातील पाण्याच्या टाकीच्या बांधकामाचा समावेश होता.

कंत्राटदारांनी सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, अशी सक्त ताकीद त्यांनी दिली. विशेषतः चिकलठाणा आठवडी बाजारातील पाण्याच्या टाकीचे काम पुढील चार महिन्यांत पूर्ण करून, चालू वर्षाच्या डिसेंबर महिन्यात कोणत्याही परिस्थितीत ही टाकी कार्यान्वित झालीच पाहिजे, असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले. या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त शहर अभियंता अनिल तानपुरे, ए. बी. देशमुख, के. एम. फाळक यांच्यासह संबंधित विभागांचे अभियंते व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संपादकीय

## मुदतबाह्य अन्नपदार्थांचे रॅकेट आणि सार्वजनिक आरोग्याशी खेळ

नवी मुंबईतील तुर्भे येथे अन्न व औषध प्रशासन (FDA) आणि पोलिसांच्या गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत उघडकीस आणलेले ७५ लाखांहून अधिक किमतीच्या मुदतबाह्य अन्नपदार्थांच्या रिपॅकिंगचे रॅकेट अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. नामांकित कंपन्यांच्या मॅगी, बटाटा चिप्स, कोल्ड्रिंक्स आणि रेडी-टू-ईट पदार्थांच्या पॅकेजिंगवरील मूळ एक्सपायरी डेट पुसून त्यावर नवीन तारखा छापणे आणि नवीन स्टिकर्स लावून तो माल पुन्हा बाजारात विक्रीसाठी पाठवणे, हा केवळ व्यापारी गैरप्रकार नसून नागरिकांच्या जिवाशी खेळणारा थेट गुन्हा आहे. खाद्यपदार्थ मुदतबाह्य झाल्यानंतर त्यातील पोषक घटक नष्ट होतात आणि त्यात विषारी जीवाणू तयार होण्याची दाट शक्यता असते. असे अन्नपदार्थ विशेषतः लहान मुले आणि तरुणांकडून मोठ्या प्रमाणावर सेवन केले जातात. अशा परिस्थितीत केवळ स्वतःच्या आर्थिक लाभासाठी आणि नफ्यासाठी हा विषारी साठा बाजारात खपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या 'साधना एंटरप्रायझेस'सारख्या आस्थापनांचा धाडसाने पर्दाफाश केल्याबद्दल एफडीए आणि नवी मुंबई पोलीस अभिनंदनास पात्र आहेत. या कारवाईच्या निमित्ताने अन्न सुरक्षा व्यवस्थेतील पळवाटा आणि साठवणूक गोदामांवरील नियंत्रणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. टीटीसी इंडस्ट्रियल एरियासारख्या औद्योगिक क्षेत्रात असा बेकायदेशीर व्यवहार उघडपणे सुरू असणे आणि विनापरवाना, विनापावती मालाची साठवणूक होणे हे प्रशासकीय तपासणीतील अभावाचे संकेत देते. अन्न सुरक्षा व मानके कायदा आणि भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करून परवाना निलंबित करणे ही पहिली पायरी झाली; मात्र अशा समाजकंटकांना कठोर आणि जलद शिक्षा होणे गरजेचे आहे. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी एफडीएने अशा सर्व प्रकारच्या गोदामांची आणि रिपॅकिंग युनिट्सची नियमित व अचानक तपासणी करण्याची तीव्र मोहीम राबवली पाहिजे. तसेच ग्राहकांनीही कोणतेही अन्नपदार्थ खरेदी करताना त्यावरील लेबल, पॅकेजिंग आणि एक्सपायरी डेटची बारकाईने पडताळणी करण्याचे नागरिक भान जपणे अत्यंत आवश्यक आहे.

## हर्सलच्या रमाईनगरात घरफोडी; दागिन्यांसह 60 हजारांची रोकड व महत्त्वाची कागदपत्रे लांबवली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हर्सल परिसरातील रमाईनगर भागात घरफोडीची एक गंभीर घटना समोर आली असून, अज्ञात चोरट्यांनी एका घरातील सोने-चांदीचे दागिने, ६० हजार रुपयांची रोकड आणि मालमत्तेशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी लता गणेश कांबळे (वय ४५) यांनी हर्सल पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लता कांबळे या कुटुंबासह रमाईनगर येथे राहतात. त्यांचे पती वर्षभरापूर्वी मयत झाले असून, त्यांची मुलगी लक्ष्मी आणि जावई दीपक शंकर सोनवणे (रा. आन्वा, ता. भोकरदन, जि. जालना) हे देखील त्यांच्याचसोबत राहतात. कांबळे यांच्या घराच्या मागील खोलीतील कपाटात सोन्या-चांदीचे दागिने, रोकड आणि घराच्या मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यात आली होती.

मंगळवारी (२५ ऑगस्ट) सकाळी साडेसातच्या सुमारास लता कांबळे आणि त्यांच्या मुलाने कपाट उघडून पाहिले असता, आतील ऐवज गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी कपाटाचा ताबा घेऊन घरातील सुमारे तीन ग्रॅम वजनाचे जुने सोन्याचे मंगळसूत्र व कानातील टॉप्स, अंदाजे तीन भार वजनाचे चांदीचे जोडवे व पायातील चैन, तसेच ६० हजार रुपयांची रोकड असा ऐवज लांबवला आहे. यासोबतच घराच्या गट क्रमांक २१६ संदर्भातील न्यायालयात सुरू असलेल्या दाव्याची महत्त्वाची कागदपत्रेही चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

चोरीला गेलेल्या एकूण मुद्देमालाची अंदाजे किंमत ७८ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घरातीलच कपाटातून हा ऐवज चोरीला गेल्याने घरफोडी करणाऱ्यांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान आता पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार नंदलाल चव्हाण करत आहेत.

## विशेष सखोल पुनरिक्षण (SIR)-2026 अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

### 30 सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (जिमाका) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision-SIR)-२०२६ अंतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव असल्याची तसेच नाव, पत्ता, वय, लिंग व अन्य तपशील अचूक असल्याची खात्री करावी. आवश्यक असल्यास दावे व हरकती दि. ३० सप्टेंबरपर्यंत दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हा निवडणूक कार्यालयाने केले आहे. मतदार यादी तयार करण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दावा करता येईल. तसेच मतदार यादीत समाविष्ट असलेल्या नावाबाबत अथवा नोंदीतील तपशीलाबाबत आक्षेप असल्यास दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत विहित नमुन्यात दावा अथवा हरकत दाखल करता येईल.

**दावे व हरकतींसाठी विहित नमुने :** मतदार यादीत नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्र. ६, मतदार यादीतील नावाच्या समावेशास हरकत घेण्यासाठी अथवा नाव वगळण्यासाठी नमुना क्र. ७, तर मतदार यादीतील नोंदींच्या तपशीलात दुरुस्ती, बदल अथवा अद्ययावत करण्यासाठी नमुना क्र. ८ मध्ये अर्ज करता येईल.

# परत फिरा रे पाखरांनो निळ्या आभाळी : बाबासाहेबांचे स्वप्न साकारण्यासाठी

आजही मनाच्या तळाशी लहानपणीची एक आठवण अगदी जिवंत आहे. माझे बालपण ज्या खेडेगावात गेले, ते गाव म्हणजे जालना जिल्ह्यातील साकळगाव या गावात १४ एप्रिल म्हणजे केवळ दिनदर्शिकेवरील एक दिवस नव्हता. तो आमच्या अस्मितेचा, स्वाभिमानाचा, सामाजिक जागृतीचा आणि परिवर्तनवादी विचारांचा उत्सव होता. बौद्ध-मातंग वस्तीतील वातावरण काही दिवस आधीपासूनच बदलून जायचे. घरांची स्वच्छता, रस्त्यांची साफसफाई, बाबासाहेबांच्या प्रतिमेची सजावट, प्रभातफेरीची तयारी आणि प्रत्येकाच्या मनात निर्माण होणारा एक वेगळाच उत्साह!

१४ एप्रिलच्या सकाळी बौद्ध-मातंग वस्तीतील अनेक घरांवर निळे झेंडे अभिमानाने फडकताना दिसायचे. बौद्ध-मातंग बांधवांच्या घरांसोबतच इतर बहुजन बांधवांच्या घरांवरही तो निळा झेंडा डौलाने फडकत असे. घर झोपडीचे असो की पक्के, गरीबाचे असो की श्रीमंताचे; त्या निळ्या झेंड्याने सर्व घरांना जणू एकाच विचाराच्या धाग्यात बांधले होते. गावातील प्रत्येक गल्ली जणू एकच संदेश देत असे "आम्ही माणूस आहोत आणि आम्हालाही स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे!"

तो निळा झेंडा केवळ कापडाचा तुकडा नव्हता. तो आत्मसन्मानाचा झेंडा होता. तो समतेचा झेंडा होता. तो शिक्षणाचा झेंडा होता. तो न्यायाचा झेंडा होता. तो अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा झेंडा होता. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचा झेंडा होता.

काळ बदलला. गावांची रूपे बदलली. जीवनशैली बदलली. तंत्रज्ञान बदलले. हातात मोबाईल आले, जग जवळ आले; पण मनामनांतील अंतर मात्र काही ठिकाणी वाढत गेले. आज स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे ज्यांनी एकत्रितपणे अन्यायाचा सामना केला, ज्यांनी एकाच वेदनेतून संघर्षाची भाषा शिकली, ज्यांच्या पिढ्यांनी सामाजिक बहिष्काराचे चटके सोसले, ते आज एकमेकांपासून दूर का जात आहेत? हा प्रश्न केवळ बौद्ध आणि मातंग समाजापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न संपूर्ण बहुजन समाजाच्या भवितव्याचा आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही एका जातीचे किंवा एका समाजाचे नेते नव्हते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य त्या सर्व शोषित, वंचित, दलित, पीडित आणि उपेक्षित माणसांच्या मुक्तीसाठी समर्पित केले, ज्यांना हजारो वर्षांच्या सामाजिक व्यवस्थेने माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार नाकारला होता. बाबासाहेबांनी अन्यायाची मुळे ओळखली आणि त्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग दाखविला."शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा संदेश कोणत्याही एका समाजासाठी नव्हता. तो त्या प्रत्येक माणसासाठी होता, ज्याला अन्यायाने दाबले गेले होते.

बाबासाहेबांनी वंचित घटकांना आत्मभान दिले. "तू गुलाम नाहीस, तू माणूस आहेस," हा आत्मविश्वास त्यांच्या विचारांनी निर्माण केला. ज्यांच्या हातात शतकानुशतके केवळ श्रम होते, त्यांच्या हातात त्यांनी पुस्तक दिले. ज्यांच्या ओठांवर बोलण्याची बंदी होती, त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला. ज्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले होते, त्यांच्यासाठी ज्ञानाची दारे उघडली. ज्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आले, त्यांना संविधानाच्या माध्यमातून समान नागरिकत्वाची ओळख मिळवून दिली.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानामुळे आज आपण ताठ मानेने उभे राहू शकतो, मतदानाचा अधिकार वापरू शकतो, शिक्षण घेऊ शकतो, नोकरी करू शकतो, प्रशासनात जाऊ शकतो, न्यायालयात न्याय मागू शकतो आणि आपल्या हक्कासाठी आंदोलन करू शकतो; या सर्वांच्या पाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रचंड संघर्ष उभा आहे. हे आपणाला विसरून चालणार नाही.म्हणूनच निळा रंग हा कोणत्याही एका जातीचा रंग नाही. निळा रंग हा विशाल आकाशाचा रंग आहे. आकाश जसे कोणत्याही एका व्यक्तीचे नसते, तसेच बाबासाहेबांचे विचार कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित असू शकत नाहीत. निळे आकाश सर्वांना सामावून घेते. त्याचप्रमाणे बाबासाहेबांचा विचार सर्व शोषितांना, सर्व वंचितांना आणि सर्व न्यायप्रिय माणसांना एकत्र घेऊन चालणारा विचार आहे.म्हणून आज मनातून एक हाक उमटते परत फिरा रे पाखरांनो निळ्या आभाळी! वेगवेगळ्या फांद्यांवर बसून आपण एकमेकांशी भांडण्यात वेळ घालवणार आहोत का, की विशाल आकाशात पुन्हा एकत्र भरारी घेणार आहोत? हा निर्णय आजच्या पिढीने घ्यायचा आहे.

आज काही ठिकाणी सामाजिक प्रश्नांपेक्षा ओळखीचे राजकारण मोठे होताना दिसते. विचारांपेक्षा झेंड्यांचे रंग महत्त्वाचे ठरू लागले आहेत. छोट्या-छोट्या कारणांवरून समाजांमध्ये दुरावा निर्माण केला जात आहे. गैरसमज पसरवले जात आहेत. सोशल मीडियावर वैचारिक संवादाऐवजी आरोप, अपमान आणि द्वेषाची भाषा वाढताना दिसते आहे.पण आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे याचा फायदा कोणाला होतो?ज्यांना बहुजन समाज कधीही एकत्र आलेला नको आहे, त्यांनाच!

मित्रांनो इतिहास साक्षी आहे शोषित समाज जेव्हा विभागला गेला, तेव्हा त्याचे शोषण झाले. पण जेव्हा तो शिक्षित झाला, संघटित झाला आणि आपल्या हक्कासाठी एकत्र उभा राहिला, तेव्हा व्यवस्थेलाही बदलावे लागले. म्हणून बहुजन समाजाची खरी ताकद केवळ संख्येत नाही; ती त्याच्या वैचारिक एकतेत आहे.

बौद्ध आणि मातंग समाजाच्या सामाजिक जीवनात, संघर्षात आणि वेदनांमध्ये अनेक समान धागे आहेत. दोन्ही समाजांनी उपेक्षा अनुभवली आहे. दोन्ही समाजांच्या पिढ्यांनी दारिद्र्य, अशिक्षण आणि सामाजिक भेदभावाचा सामना केला आहे. दोन्ही समाजातील कुटुंबांनी कष्टातून आपल्या पिढ्या घडवल्या आहेत. दोन्ही समाजातील तरुणांना शिक्षण आणि रोजगारासाठी संघर्ष करावा लागला आहे.मग आपल्यामध्ये संघर्ष कशासाठी?एकमेकांशी स्पर्धा कशासाठी?एकमेकांच्या वेदना समजून घेण्याऐवजी टीका कशासाठी?आपल्याला इतिहासाने पुरेसे दुःख दिले नाही का?

आपल्या पूर्वजांनी सोसलेल्या अपमानातून आपण काही शिकणार नाही का? आजची गरज कोण मोठा आणि कोण लहान हे सिद्ध करण्याची नाही. आजची गरज आहे ती एकमेकांच्या हातात हात देण्याची. कारण समाजातील प्रत्येक घटकाची प्रगती झाली, तरच संपूर्ण बहुजन समाजाची ताकद वाढेल.

बाबासाहेबांनी आपल्याला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी जबाबदारीची जाणीवही करून दिली. संविधानाने समानतेचा अधिकार दिला, पण समानतेचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी समाजावर सोपवली. संविधानाने बंधुतेचे मूल्य दिले, पण ती बंधुता प्रत्यक्ष जीवनात जगण्याची जबाबदारी आपली आहे.

आज आपण महामानवांच्या जयंतीनिमित्त मोठमोठ्या मिरवणुका काढतो. वेगवेगळे झेंडे लावतो. आकर्षक देखावे करतो. डीजेच्या तालावर नाचतो. प्रतिमांना पुष्पहार अर्पण करतो. हे सर्व करताना मात्र स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे आपण महामानवांच्या विचारांचेही स्मरण करतो का?जर आपल्या घरावर निळा, हिरवा पिवळा भगवा झेंडा आहे, पण आपल्या मनात दुसऱ्या वंचित समाजाविषयी द्वेष आहे, तू आमच्याच समाजाचं खाऊन आमच्याच समाजामुळे मोठा झालास.तु आमच्याच महामानवामुळे मोठा झालास असे हिनवू नये. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका जातीचे नाहीत तर ते सर्व धर्मीयाचे आहेत.जर आपण बाबासाहेबांचा जयजयकार करतो, पण आपल्या शेजारी राहणाऱ्या दुःखी, वंचित माणसाच्या वेदनेशी आपले नाते नाही, तर त्या घोषणांचा उपयोग काय?जर आपण "जय भीम" म्हणतो, पण बंधुभावाने एकमेकांशी वागू शकत नाही, तर आपण बाबासाहेबांच्या विचारांशी खरोखर प्रामाणिक आहोत का?हा काळ आत्मपरीक्षणाचा आहे.

विशेषतः तरुण पिढीने आता पुढे येण्याची गरज आहे. जुन्या पिढ्यांमध्ये काही कारणांनी निर्माण झालेले मतभेद पुढच्या पिढीने वारसा म्हणून स्वीकारण्याची आवश्यकता नाही. आपल्याला नवा इतिहास घडवायचा आहे.बौद्ध समाजातील तरुण आणि मातंग समाजातील तरुणांनी एकत्र येऊन शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय, विद्यार्थ्यांचे प्रश्न, महिला सक्षमीकरण, बेरोजगारी, व्यसनमुक्ती आणि ग्रामीण विकास यांसारख्या प्रश्नांवर काम केले पाहिजे. राहिला प्रश्न उपवर्गीकरणाचा यात 13 टक्क्याचे तुकडे करण्यापेक्षा 13% मध्ये घटनेच्या अधीन राहून 20 टक्क्यापर्यंत कशी भर पडेल हे पाहिले पाहिजे. शासन दरबारी 59 जातींनी मिळून आपापसात न भांडता शासन दरबारी भांडले पाहिजे. दोन्ही समाजाचे विविध सामाजिक प्रश्नांवर मतभेद असू शकतात. लोकशाहीत मतभेद असणे चुकीचे नाही; परंतु मतभेदांचे रूप वैरात आणि द्वेषात बदलणे घातक आहे. अनुसूचित जातीतील 59 एससी समाजांनी संविधानाच्या चौकटीत राहून आपले प्रश्न मांडले पाहिजेत. न्याय, प्रतिनिधित्व आणि संधी यांसाठी संघर्ष केला पाहिजे; पण त्या संघर्षात आपल्या महापुरुषांचा अपमान करणे किंवा एकमेकांच्या इतिहासावर चिखलफेक करणे कोणत्याही समाजाच्या भवितव्यासाठी हिताचे नाही.

आपली पुढची पिढी आपल्याकडून काय शिकणार? आजची तरुण पिढी खूप हुशार आहे ती प्रत्येकाला ओळखते तुम्ही समाजामध्ये काय पेरत आहात हे तरुण पिढीला कळते उद्या हीच करून पिढी तुम्हाला माफ करणार नाही. महापुरुषांनी आपल्याला एकत्र येण्याचा संदेश दिला आणि आपण मात्र त्यांच्या नावावर विभागलो, तर त्यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती?

आपली खरी लढाई एकमेकांविरुद्ध नसून अन्याय, अज्ञान, गरिबी, बेरोजगारी आणि विषमतेविरुद्ध असली पाहिजे.ज्या दिवशी गावातील बौद्ध आणि मातंग तरुण एकत्र येऊन आपल्या समाजमंदिरात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करतील, त्या दिवशी खऱ्या अर्थाने परिवर्तन घडेल.ज्या दिवशी दोन्ही समाजातील महिला एकत्र येऊन आर्थिक स्वावलंबनासाठी बचत गट उभारतील, त्या दिवशी बाबासाहेबांच्या विचारांना नवी दिशा मिळेल.ज्या दिवशी युवक एकत्र येऊन व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, शिक्षण आणि रोजगारासाठी काम करतील, त्या दिवशी निळ्या झेंड्याचा अर्थ अधिक व्यापक होईल. आणि ज्या दिवशी एखाद्या समाजावर अन्याय झाला, तर दुसरा समाजही त्याच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील, त्या दिवशी खरी बंधुता निर्माण होईल.

आज आपल्याला एकमेकांच्या समाजातील चांगल्या गोष्टी शिकण्याची गरज आहे. एकमेकांच्या महापुरुषांचा आदर करण्याची गरज आहे. कोणाचाही इतिहास पुसून टाकून स्वतःचा इतिहास मोठा होत नाही. उलट प्रत्येक समाजाच्या संघर्षाचा सन्मान केल्याने बहुजन चळवळीची ताकद वाढते.

बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानात प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. मग आपण स्वतःच आपल्या समाजांमध्ये भिंती का उभ्या करतो? आपण स्वतःच दुराव्याची भाषा का करतो? आपण स्वतःच एकमेकांच्या विरोधात उभे राहून आपल्या सामूहिक शक्तीला कमजोर का करतो?

आज संघर्ष नव्हे, संवाद हवा.
द्वेष नव्हे, प्रेम हवे.
स्पर्धा नव्हे, सहकार्य हवे.
दुरावा नव्हे, एकोपा हवा.
आरोप नव्हे, आत्मपरीक्षण हवे.

जातीय अहंकार नव्हे, तर मानवी बंधुता हवी.आपण सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, पाखरे कितीही वेगवेगळ्या दिशांनी उडाली तरी त्यांच्यासाठी आकाश एकच असते. त्याचप्रमाणे आपण कितीही वेगवेगळ्या समाजांची ओळख घेऊन जगत असलो, तरी आपला संघर्ष समानतेसाठी आहे, आपली लढाई मानवी प्रतिष्ठेसाठी आहे आणि आपले अंतिम ध्येय सामाजिक न्यायाचे आहे.

म्हणून आज पुन्हा एकदा त्या विशाल निळ्या आभाळाकडे पाहून स्वतःला विचारू या आपण वेगळ्या फांद्यांवर बसून एकमेकांशी संघर्ष करत राहणार आहोत का? की बाबासाहेबांच्या विचारांच्या विशाल आकाशात पुन्हा एकदा एकत्र भरारी घेणार आहोत? वेळ आली आहे मतभेद विसरण्याची. वेळ आली आहे मनामनांतील भिंती पाडण्याची.

वेळ आली आहे हातात हात घेऊन नव्या पिढीसाठी नवा मार्ग निर्माण करण्याची.आणि वेळ आली आहे बाबासाहेबांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याची.चला, परत फिरू या रे पाखरांनो त्या निळ्या आभाळी!

कारण ते आभाळ कोणत्याही एका जातीचे नाही. तो निळा झेंडा कोणत्याही एका समाजाचा नाही.

तो विचार सर्व वंचितांचा आहे.
तो संघर्ष सर्व शोषितांचा आहे.

आणि ते स्वप्न आहे एका अशा भारताचे जिथे माणूस माणसाशी माणसासारखा वागेल.

बाबासाहेबांचे स्वप्न केवळ त्यांच्या प्रतिमेला हार घालून पूर्ण होणार नाही; ते स्वप्न पूर्ण होईल तेव्हा, जेव्हा आपण विचाराने एकत्र येऊ, बंधुतेने जगू आणि अन्यायाविरुद्ध खांद्याला खांदा लावून उभे राहू.

चला, निळ्या आभाळाखाली पुन्हा एक होऊ या... कारण एकता हीच आपली शक्ती आहे आणि बंधुता हाच बाबासाहेबांच्या विचारांचा खरा श्वास आहे! जय भिम. जय संविधान. लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

लेखक
रामदास वच्छालामाई रखमाजी वाघमारे
छत्रपती संभाजीनगर
मो.नं. 8888125610

### जुन्या घाटमार्गावरील वाहतुकीचा ताण होणार कमी जळगावकडील वाहने नव्या मार्गाने संभाजीनगरकडील वाहने जुन्या घाटातून

# अजिंठा घाटाचा कोंडीमुक्त मार्ग मोकळा होणार!

### जळगाव छत्रपती संभाजीनगर प्रवासासाठी अजिंठा गावातून 6 किमीचा नवा चारपदरी महामार्ग सर्वेक्षण पूर्ण







हिंदू प्रकाशवार्ता शेख हक्कानी

**फर्दापूर :** जळगाव छत्रपती संभाजीनगर या महत्त्वाच्या मार्गावरील अजिंठा घाटातील वाहतूक कोंडीची समस्या आता कायमस्वरूपी सुटण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक NH 753 F वरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी अजिंठा गावातून डोंगराला वळसा घालत जाणारा सुमारे ६ किलोमीटर लांबीचा नवीन चारपदरी पर्यायी महामार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे विशेष म्हणजे या मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून मार्गाची आखणीही निश्चित करण्यात आली आहे

अजिंठा घाट हा जळगाव छत्रपती संभाजीनगर मार्गावरील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी मालवाहतूक तसेच पर्यटकांची वाहतूक सुरू असते त्यातच जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची संख्या वाढल्याने घाट परिसरात अनेकदा वाहतूक कोंडी निर्माण होते दोन्ही दिशांची वाहने एकाच घाटमार्गाचा वापर करत असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागण्याचे प्रकारही वारंवार घडतात

जळगावकडील वाहने नव्या मार्गाने

प्रस्तावित आराखड्यानुसार जळगावहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहने अजिंठा गावातून सुरू होणाऱ्या नव्या सुमारे ६ किलोमीटरच्या चारपदरी मार्गावरून वळविण्यात येणार आहेत हा मार्ग डोंगराला वळसा घालत पुढे मुख्य महामार्गाला जोडण्यात येणार आहे त्यामुळे जळगावकडून येणाऱ्या वाहनांना सध्याच्या घाटातील चढ-उताराच्या मार्गावरून जाण्याची गरज कमी होणार आहे

संभाजीनगरकडील वाहतूक जुन्या घाटातून

दरम्यान छत्रपती संभाजीनगरकडून जळगावच्या दिशेने जाणारी वाहने सध्याच्या सुमारे चार किलोमीटरच्या जुन्या अजिंठा घाटमार्गाचा वापर करतील अशा प्रकारे दोन्ही दिशांची वाहतूक स्वतंत्र मार्गाने वळविण्याची व्यवस्था झाल्यास घाटातील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे

अजिंठा लेणी परिसरालाही फायदा

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी हे देश विदेशातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे पर्यटन हंगामात या परिसरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते अजिंठा लेणी परिसर पार्किंग क्षेत्र आणि घाटमार्गादरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीचा फटका स्थानिक नागरिक व्यावसायिक तसेच पर्यटकांना बसतो

नवीन पर्यायी महामार्गामुळे घाटातील वाहतूक स्वतंत्रपणे नियंत्रित करता येणार असल्याने पर्यटन वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होण्याची शक्यता आहे

फर्दापूरसह परिसरातील प्रवाशांना दिलासा

अजिंठा घाटातील वाहतूक सुरळीत झाल्यास फर्दापूर अजिंठा आणि जळगाव छत्रपती संभाजीनगर मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या हजारो वाहनचालकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे एसटी बस मालवाहतूक वाहने खासगी प्रवासी वाहने तसेच पर्यटकांच्या वाहनांना वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीचा सामना कमी प्रमाणात करावा लागणार आहे

सर्वेक्षण पूर्ण पुढील प्रक्रियेकडे लक्ष

अजिंठा घाटावरील वाहतूक कोंडीमुळे पर्यायी मार्गाची तातडीने गरज होती या रस्त्याचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्याची आखणी निश्चित करण्यात आली आहे

नवीन चारपदरी पर्यायी मार्ग प्रत्यक्षात कधी आकाराला येतो याकडे आता जळगाव फर्दापूर अजिंठा आणि छत्रपती संभाजीनगर परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे हा मार्ग पूर्ण झाल्यास अजिंठा घाटातील वाहतूक कोंडीवर दीर्घकालीन उपाय मिळण्याबरोबरच जळगाव छत्रपती संभाजीनगर प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे

## जि.प.केंद्र प्रा. शाळा,सोयगाव येथे पोलीस स्टेशन तर्फे भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन

### "हेल्मेट वापरा,सुरक्षित प्रवास करा!"

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.३१ ऑगस्ट

जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव येथे सोमवार रोजी वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी पोलीस स्टेशन सोयगाव तर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वाहतूक नियम पाळा,अपघात टाळा तसेच हेल्मेट वापरा या विषयांवर आकर्षक व संदेशपर चित्रे काढून रस्ता सुरक्षेबाबत जनजागृतीचा संदेश दिला.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे याचे विद्यार्थीनीनी रक्षाबंधन सणा निमित्ताने राखी बांधून औक्षण केले.

या प्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.त्यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व समजावून सांगत रस्ता सुरक्षा आणि हेल्मेट वापराबाबत मार्गदर्शन केले.चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वाहतूक सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे मांडला.नियम पाळूया... अपघात टाळूया... सुरक्षित जीवन जगूया!,यावेळी मुख्याध्यापक हरीदास काटोले,कृषीभुषण अरुण सोहनी सह किरणकुमार पाटील, रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर,अंकुश काळे, विवेक महाजन कला निर्देशक, अनिल देसाई क्रीडा निर्देशक,पुनम लाड,तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदी डॉ. भीमराव हत्तीहंबीरे यांची फेरनियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदी समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीहंबीरे यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या महत्त्वपूर्ण नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) अल्पसंख्यक विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष इरफान शेख यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील राजकीय व सामाजिक कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी शहरातील पदाधिकारी शहर उपाध्यक्ष रिजवान पटेल, उपाध्यक्ष मुस्तफा पटेल तसेच शहर उपाध्यक्ष इलियास पटेल उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी डॉ. भीमराव हत्तीहंबीरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या फेरनियुक्तीबद्दल आनंद व्यक्त केला.

इरफान शेख यांनी सांगितले की, डॉ. भीमराव हत्तीहंबीरे हे समाजकारण आणि जनहिताच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या अनुभवाचा व प्रभावी कार्यशैलीचा पक्षाला निश्चितच लाभ होईल. महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदाच्या माध्यमातून ते पक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. भीमराव हत्तीहंबीरे यांच्या फेरनियुक्तीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल आणि जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असेही इरफान शेख यांनी म्हटले आहे.

## शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल रमाकांत कुलकर्णी यांचा सत्कार



**जिंतूर :** इटोली येथील रमाकांत श्रीकांत कुलकर्णी इटोलीकर यांची महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा परिषद, सातारा येथे शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल ग्रीन पार्क, महादेव मंदिर, जिंतूर येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

इटोली ग्रामपंचायतीचे सरपंच जगदीश घुगे व भाजपा ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष नागेश तडकसे यांच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात कुलकर्णी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याच्या शुभेच्छा दिल्या.

रमाकांत कुलकर्णी यांना कुटुंबाकडून शैक्षणिक वारसा लाभला असून गुणवत्तेच्या बळावर त्यांनी शिक्षक होण्याचे स्वप्न साकार केले आहे. या प्रसंगी सरपंच जगदीश घुगे यांनी त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील युवकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी नागरिक, मित्रपरिवार व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदारांनी आपले नाव व तपशील तपासून आवश्यक असल्यास तात्काळ अर्ज करावा - जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण-2026 (SIR) अंतर्गत परभणी जिल्ह्यातील चारही (95-जिंतूर, 96-परभणी, 97-गंगाखेड, 98-पाथरी) विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी आज, 31 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली. मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून काही त्रुटी असल्यास किंवा पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास 30 सप्टेंबर 2026 पर्यंत विहित नमुन्यात दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. अंतिम मतदार यादी दि. 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिध्द होणार आहे.



प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अरुणा संगेवार, परभणी जिल्ह्यातील मान्यता प्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या अध्यक्ष, सचिव तसेच अधिकृत प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. बैठकीस बहुजन समाज पार्टीचे जाफरखान मुसाखान, आम आदमी पार्टीचे शेख हुसेन, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अक्षय भगवानराव जगताप, भारतीय जनता पार्टीचे आकाश रवी पोटे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे संभानाथ काळे आणि वंचित बहुजन आघाडीचे पंचांगे दीपक उपस्थित होते.

प्रारुप याद्या जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालय, तहसिल कार्यालय, मतदान केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. बैठकीत उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रारूप मतदार यादीची प्रत देण्यात आली. तसेच दावे व हरकती दाखल करण्याची प्रक्रिया, नो मॅपिंग (No Mapping), ॲनोमली (Anomaly), अनुपस्थित / शोधूनही न सापडलेले, कायमस्वरूपी स्थलांतरित, मयत, अन्यत्र मतदार म्हणून नोंद / Duplicate ( ASDD) तसेच अनकलेक्टबल इएफएस (Un-collectable EFs) बाबतची कार्यवाही आणि अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

परभणी जिल्हयातील एसआयआर कामाची सद्यस्थिती- दि. 24 ऑगस्ट 2026 च्या SIR Status Report नुसार परभणी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण 15 लाख 41 हजार 7 मतदार असून 1,623 बीएलओ कार्यरत आहेत. सर्व बीएलओकडून ईएफ फॉर्म डाउनलोडचे काम 100 टक्के पूर्ण झाले असून 15,41,007 ईफ ची छपाई व वितरणही 100 टक्के पूर्ण झाले आहे.

यापैकी 13,60,758 ईफचे डिजिटायझेशन व पडताळणी पूर्ण झाली असून त्याचे प्रमाण 88.30 टक्के आहे. जिल्ह्यात 1,80,249 Uncollectable EFs, 16,428 No Mapping आणि 5,328 Anomaly नोंदी असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

**विधानसभा मतदारसंघनिहाय No Mapping नोंदी पुढीलप्रमाणे आहेत :** जिंतूर – 2,675, परभणी – 8,740, गंगाखेड – 1,387, पाथरी – 3,626, एकूण – 16,428. तर Anomaly नोंदींची संख्या जिंतूरमध्ये 1,572, परभणीत 526, गंगाखेडमध्ये 1,011 आणि पाथरीमध्ये 2,219 असून जिल्ह्यातील एकूण Anomaly नोंदी 5,328 आहेत.

## शिवना येथे 97 गरजू लाभार्थ्यांना राशनकार्ड व आरसी कार्डचे वितरण

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील शिवसेना संपर्क कार्यालयात गरजू नागरिकांसाठी राशनकार्ड व आरसी कार्ड वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्या हस्ते परिसरातील ९७ गरजू लाभार्थ्यांना राशनकार्ड व आरसी कार्डचे वितरण करण्यात आले.



गरजू व पात्र नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा तसेच आवश्यक कागदपत्रे उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी राशनकार्डाची आवश्यकता असते. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना राशनकार्ड उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आलेल्या या प्रयत्नामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावेळी लाभार्थ्यांनी राशनकार्ड व आरसी कार्ड मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. शासनाच्या विविध योजना आणि सुविधांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमावेळी पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी गरजू नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तसेच नागरिकांची कागदपत्रांशी संबंधित कामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी शिवना गावचे प्रशासक डॉ. सलमान खान, इमरान मोमीन, मुश्ताक कुरैशी, खुर्रम चाउस, शेख कासिम, गुड्डू पेशमाम, मजहर पेशमाम, शेख वहाब, शेख शाफी, अमोल जगताप, गजानन देशमुख यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गरजू नागरिकांना शासनाच्या विविध योजना व सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्राधान्य देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## श्रावण महिना कालावधीत वेरुळ गावात वाहन बंदी

छत्रपती संभाजीनगर, दि.31 (जिमाका)- श्रावण महिन्यात वेरुळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरात होणारी भाविकांची गर्दी पाहता भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशान्वये दि. १ सप्टेंबर आणि दि.४ ते ८ सप्टेंबर या कालावधीत रात्री ८ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत वेरूळ येथील भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद (नो व्हेईकल झोन) राहणार आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी भगवान महावीर चौक व मालोजीराजे भोसले चौकाच्या पलीकडे वाहनांच्या पार्किंगसाठी मोकळी जागा व पार्किंग व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. तेथे वाहनधारकांना आपली वाहने पार्किंग करता येतील. मोटार वाहन कायदा कलम ११५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य किंवा केंद्र शासनाच्या मालकीची सेवेतील वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे,असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. भाविकांनी सहकार्य करावे,असे आवाहनही करण्यात आले आहे.

## स्वरदाने छंदाचे व्यवसायात रूपांतर; 'फोटो पार्क क्रिएटिव्ह स्टुडिओ'चे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथे महिला उद्योजिका स्वरदा डंके यांच्या 'फोटो पार्क क्रिएटिव्ह स्टुडिओ'चे उद्‌घाटन ज्येष्ठ छायाचित्रकार व पक्षीतज्ज्ञ डॉ. दिलीप यार्दी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी रोहन डंके यांनी डॉ. यार्दी यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी स्टुडिओच्या वैशिष्ट्यांची माहिती देताना स्वरदा डंके यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगरमध्ये महिलेकडून सुरू करण्यात आलेला इनडोअर आणि आउटडोअर फोटोग्राफीची सुविधा असलेला हा आगळावेगळा स्टुडिओ आहे. इनडोअर व आउटडोअर फोटोग्राफीसोबतच विविध सण-उत्सवांच्या अनुषंगाने विशेष फोटोशूटची सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कुटुंबीयांचे फोटोशूट, मॅटर्निटी पोर्टफोलिओ तसेच नवजात बालकांचे (न्यू बॉर्न) फोटोग्राफी हे स्टुडिओचे प्रमुख आकर्षण असल्याचे त्यांनी सांगितले. उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. दिलीप यार्दी म्हणाले की, बीएस्सी व एमएस्सीमध्ये सुवर्णपदक मिळवलेल्या स्वरदा डंके यांनी नोकरीच्या मागे न धावता आपल्या छंदाचे व्यवसायात रूपांतर करण्याचे धाडसी पाऊल उचलले आहे. तरुणींनीही आपल्या कौशल्याला आणि छंदाला व्यवसायाची जोड देत स्वावलंबी होण्याचा आदर्श स्वरदा यांनी निर्माण केला आहे, असे त्यांनी नमूद केले.

उद्‌घाटनानंतर महापौर समीर राजूरकर तसेच नगरसेवक सुमित त्रिवेदी यांनी स्टुडिओला भेट देऊन स्वरदा डंके यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश जोशी, महेश डंके, संगीता जोशी व संध्या डंके यांनी परिश्रम घेतले.

## सांस्कृतिक-आध्यात्मिक चळवळीला बळ देणे आवश्यक : विजय चोरडिया

**जिंतूर दि. ३१ (प्रतिनिधी) :** सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे समाजातील वाचनसंस्कृती कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत समाजाला सकारात्मक दिशा देण्यासाठी मनोरंजनाबरोबरच सांस्कृतिक व आध्यात्मिक चळवळींना अधिक बळ देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन व्हॉइस ऑफ मीडियाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांनी केले.



बोरी ग्रामपंचायतीच्या वतीने नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच निर्मलाताई चौधरी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अजय चौधरी, माजी उपसरपंच अश्विनी चौधरी, शेख रफीक, व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख, जिंतूर तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, संदीप माहूरकर व भागवत चव्हाण उपस्थित होते.

यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने विजय चोरडिया यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. बोरी प्रेस क्लबचे अध्यक्ष आनंद मुरक्या, अजय चौधरी व मंचकराव देशमुख यांनी मनोगत व्यक्त करत चोरडिया यांच्या निवडीचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना चोरडिया म्हणाले, व्हॉइस ऑफ मीडियाच्या माध्यमातून देशभरातील सुमारे साडेचार लाख पत्रकार सदस्य संघटित झाले असून महाराष्ट्रातील सुमारे ८ हजार ५०० पत्रकारांचा सक्रिय सहभाग आहे. पत्रकारांच्या विविध समस्या, अडचणी व हक्कांसाठी संघटना सातत्याने कार्यरत असून स्थानिक पत्रकारांच्या प्रश्नांबाबत ग्रामपंचायतींसह सर्व संस्थांनी सकारात्मक सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास संजय चौधरी, राहुल कनकुटे, सखाराम सोंगे, नागेश नितनवरे, राजू भैरट, अमर चौधरी, विजय राठोड, गुलाब चौधरी, बालाजी चांदिवले यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन विजय राठोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन करून नागरे यांनी मानले.

## श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर कन्या विद्यालयाचे सुभाष मुळी यांचा गौरव

**जिंतूर:** तालुक्यातील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर कन्या विद्यालयाचे कर्मचारी सुभाष पुरुषोत्तम मुळी यांनी सलग ३१ वर्षे अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यकठोर राहून आपली सेवा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यांच्या या ३१ वर्षांच्या दीर्घ, प्रेरणादायी आणि निष्कलंक सेवापूर्तीनिमित्त विद्यालयात एका सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



माजी आमदार मा. रामप्रसादजी बोर्डीकर आणि संस्थेच्या अध्यक्षा सौ. मीनाताई बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी कन्या विद्यालयातील आपली सेवा पूर्ण केली. या सेवापूर्ती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उमेश कोरडे हे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रभाकर अभुरे उपस्थित होते. तसेच मंचावर प्राचार्य कैलास मुटकुळे, मुख्याध्यापक राजू वाकळे, मुख्याध्यापक शिवाजी भोंडवे, अलका वसमतकर, प्राचार्य खंडेराव भिसे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी सुभाष मुळी यांच्या ३१ वर्षांच्या सेवाकाळातील सचोटी, कामावरील निष्ठा आणि वेळेचे भान याबद्दल गौरवोद्गार काढले. तसेच बोर्डीकर परिवाराच्या मार्गदर्शनाखाली उभ्या राहिलेल्या शिक्षण संस्थांच्या उभारणीत आणि वाटचालीत त्यांनी दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे मनोगतात व्यक्त केले. कार्यालयातील प्रत्येक सहकाऱ्यासाठी मार्गदर्शक ठरलेल्या या सत्कारमूर्तीचा सत्कार पाहून उपस्थितांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष घाटूळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय जोशी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंदना काळजाते, विजय देशमुख, सखाराम घवले, प्रशांत देशमुख, अंकुश पिंपळकर, सुबोध मते, किरण मते, अनिल मेटांगळे, गोविंद काटे यांसह आदी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले व सहकार्य केले.

## उत्कृष्ट कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रांसाठी 'ग्रीन चॅनेल'द्वारे मान्यता घेण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-:** उच्च दर्जाचे, उद्योगाभिमुख व परिणामाधारित उत्कृष्ट कौशल्य आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची क्षमता असलेल्या पात्र संस्थांनी 'ग्रीन चॅनेल' अंतर्गत मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, परभणी प्र. सी. खंदारे यांनी केले आहे.

उत्कृष्ट कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राची निवड करताना संस्थेकडे कायमस्वरूपी व सक्षम प्रशिक्षण पायाभूत सुविधा, प्रगत कौशल्य प्रशिक्षण देण्याची क्षमता, आवश्यक तांत्रिक सुविधा, पात्र व अनुभवी प्रशिक्षक व परीक्षक, पुरेशा प्रात्यक्षिक प्रशिक्षण, परीक्षण व मूल्यांकनाच्या सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेचा यापूर्वीचा प्रशिक्षण परिणाम व प्रशिक्षणानंतरचे रोजगारविषयक परिणाम समाधानकारक असणे अपेक्षित आहे.

संबंधित क्षेत्रातील विशेष कौशल्य क्षमता, उद्योग व औद्योगिक आस्थापनांशी असलेली मजबूत उद्योग जोडणी, संस्थेकडे उपलब्ध प्रमुख अभ्यासक्रम, नोकरीच्या भूमिका, प्रशिक्षण क्षमता व संबंधित क्षेत्रातील कौशल्यांची गरज या बाबींचाही विचार करण्यात येणार आहे. यासोबतच संस्थेची भौगोलिक पोहोच, स्थानिक उद्योगांची आवश्यकता, परिसरातील कौशल्याची मागणी, उद्योग भागीदारी, प्रशिक्षणार्थींची नेमणूक व रोजगाराचे परिणाम तसेच प्रशिक्षणानंतरच्या परिणामांची नोंद यांचा विचार केला जाणार आहे.

वरील निकष पूर्ण करणाऱ्या परभणी जिल्ह्यातील नामांकित कायमस्वरूपी खाजगी प्रशिक्षण संस्था तसेच राज्य शासनाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय विभाग, राज्य कौशल्य विकास मिशन, स्वायत्त संस्था, वैधानिक संस्था, राज्य सार्वजनिक उपक्रम, शासकीय पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी महाविद्यालये, विद्यापीठे व इतर पात्र संस्थांमधून योग्य व गुणवत्तापूर्ण कायमस्वरूपी उत्कृष्ट कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राची निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या संस्थांचे प्रस्ताव 'ग्रीन चॅनेल' अंतर्गत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर केंद्र शासनाकडे शिफारस करण्यासाठी सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे पात्र व इच्छुक संस्थांनी आवश्यक निकषांची पूर्तता करून उत्कृष्ट कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रासाठीचे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्र. सी. खंदारे, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, परभणी यांनी केले आहे.

# माता रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांनी घरावर लावावा योजनेचा बोर्ड; तरच मिळणार शेवटचा हफ्ता - सभापती जालिंदर शेंडगे यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीची महत्त्वाची बैठक आज मनपा मुख्यालयातील प्रशासकीय सभागृहात सभापती जालिंदर शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत माता रमाई घरकुल योजना आणि प्रधानमंत्री आवास योजनेशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा होऊन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. या बैठकीस समितीचे सदस्य अशोक दामले, काकासाहेब काकडे, मीना खरात, भाग्यश्री साळवे, तसेच अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त सविता सोनवणे, समाज कल्याण विभाग सहायक अधिकारी सीमा सिंदीकर, समाज विकास विभाग अधिकारी विनोद परदेशी यांच्यासह माता रमाई आणि पीएमएवाय चे अभियंत्या व कर्मचारी उपस्थित होते.

माता रमाई घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार ५० टक्के अनुदान वाटपाबाबत पालकमंत्री महोदयांच्या सूचनेनुसार सुधारित टप्पे ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार सुरुवातीला २० टक्के, बेसमेंट लेव्हलसाठी ३० टक्के, स्लॅब लेव्हलसाठी ४० टक्के आणि पूर्ण बांधकाम झाल्यानंतर उर्वरित १० टक्के रक्कम अदा केली जाणार आहे. मात्र, यावर सर्व सदस्यांनी एकमताने सूचना केली की, माता रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांनी आपल्या घरावर सदर योजनेचा लाभ घेतल्याबाबतचा बोर्ड लावणे बंधनकारक राहावे. सदस्यांच्या या सूचनांवर निर्णय देत सभापती जालिंदर शेंडगे यांनी, लाभार्थ्यांनी घरावर योजनेचा बोर्ड लावल्यानंतरच त्यांना शेवटचा हफ्ता अदा करण्यात यावा, असे स्पष्ट आदेश प्रशासनाला दिले.

सदर बैठकीत सदस्य काकासाहेब काकडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर बोलताना, १०१ बोगस लाभार्थ्यांची यादी सदस्यांनी प्रशासनाला सादर करावी आणि प्रशासनाने एक समिती नियुक्त करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर उचित कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश सभापतींनी दिले. तसेच अर्जांमध्ये त्रुटी असलेल्या नागरिकांच्या अर्जांची पडताळणी करून त्यांची पूर्तता करण्याचे व पात्र ठरवण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले.

ऑनलाइन अर्ज भरताना नागरिकांनी कोणत्याही दलालांच्या अमिषाला बळी न पडता थेट मनपा कार्यालय किंवा समाज कल्याण विभागाशी संपर्क साधून अर्ज दाखल करावा, असे आवाहन करण्यात आले. या दोन्ही ठिकाणी नागरिकांच्या मदतीसाठी विशेष कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, या प्रक्रियेसाठी लवकरात लवकर 'एक खिडकी योजना' सुरू करण्याचे निर्देशही सभापतींनी दिले. तसेच, दिव्यांग लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रिया करताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी त्यांना सर्वतोपरी मदत करावी, अशी सूचना सदस्य अशोक दामले यांनी केली, ज्यावर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश सभापतींनी प्रशासनाला दिले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मनपात गुणवंत खेळाडूंचा गौरव; 'शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिकेचे' अनावरण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मनपा मुख्यालयातील प्रशासकीय सभागृहात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून मनपा शाळांतील राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा दिमाखदार सोहळ्यात गौरव करण्यात आला. यावेळी महापौर समीर राजूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत 'शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिकेचे' अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, गटनेता किशोर नागरे, नगरसेवक राज गौरव वानखेडे, शिवाजी दांडगे, काकासाहेब काकडे, सुनील जगताप, मयूर वंजारी, मतीन पटेल, मतीन खान, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, उपायुक्त अंकुश पांढरे, क्रीडा विभाग प्रमुख विजय पाटील आणि शिक्षण विस्तार अधिकारी खान रईसा बेगम यांची प्रमुख उपस्थिती होती.



मनपा शाळांत शिक्षण घेताना विविध क्रीडा प्रकारांत राज्यस्तरावर चमकलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी स्मृतिचिन्ह व गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये तलवारबाजीतील पृथ्वीराज नलावडे व शिवराज चव्हाण, रायफल शूटिंगमधील पूर्वा जोगदंडे, सायली हिवाळे, खुशी एकलहरे व फरान शेख, कुस्तीतील प्रणव गुंजाळ, कॅरममधील श्लोक गायकवाड, बास्केटबॉलमधील श्रावणी तुपे, जलतरणमधील मैथिली उंटवाल, बॉल बॅडमिंटनमधील जीशान व जर्जिस शेख, तसेच कराटे खेळात प्रावीण्य मिळवणारे सारा एस.के. युनूस, इफा इफ्तेखार खान, उम्मे कुलसुम सय्यद नजीब, हुमा जावेद, आफिया, सुमेस्सा, जिक्रा जुबेर आणि मोहम्मद हुसेन यांचा गौरव करण्यात आला. तसेच, विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात घडविण्यासाठी मेहनत घेणारे प्रशिक्षक समीर शेख, अरबाज खान, सचिन लवरिया, सचिन परदेशी, इरफान सय्यद आणि हरिदास मस्के यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

मनपा शाळांमध्ये वर्षभर आयोजित होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांची सविस्तर माहिती विद्यार्थी, शिक्षक आणि क्रीडा मार्गदर्शकांना सहज उपलब्ध व्हावी, यासाठी तयार करण्यात आलेल्या 'शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिकेचे' प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते झाले. शहरातील उपलब्ध मैदाने विकसित करून क्रीडा संस्कृतीला अधिक बळ देण्याची गरज महापौर समीर राजूरकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली. प्रत्येक नागरिकाने दररोज किमान एक तास व्यायाम किंवा चालण्यासाठी द्यावा, यासाठी 'फिट संभाजीनगर' ही अभिनव संकल्पना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थ्यांना ब्रँड ॲम्बेसेडर बनवले जाणार असून, नगरसेवक व प्रशासकीय अधिकाऱ्यांची एक विशेष क्रीडा समिती लवकरच स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मनपा शाळांच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करताना आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, अनेक शाळांची ओळख विशिष्ट खेळांशी जोडली गेली असून टेबल टेनिस, फुटबॉल आणि बॅडमिंटन शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण दिले जात आहे. यावर्षी मनपा शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हावे, असे निर्देश त्यांनी शिक्षक व प्रशिक्षकांना दिले. मनपा शाळांमधून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणारे खेळाडू घडवण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी संजीव बालय्या, कार्यक्रमाधिकारी ज्ञानदेव सांगळे आणि क्रीडा मार्गदर्शक सागर मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव सांगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सागर मगरे यांनी मानले.

# मद्य पेय व्यापारीवर प्राण घातक हल्ला; व्यापाऱ्यावर उपचार सुरु

हिंदू प्रकाश वार्ता

**परभणी:-** परभणी येथे तरुणांना काम लागत नसल्यामुळे बेरोजगार तरुण आगावच्या उचापत्या करण्यात व्यस्त असतात असाच काहीसा प्रकार परभणी येथील वसमत रोडवरील विजय वाईन शॉप या नावाच्या दुकानावर वर येऊन काही तरुणांनी मद्य मागितल्यानंतर दुकान मालकाने पाहिले मध्याचे पैसे द्या असे म्हणल्यावर पहिले तू दारू दे आम्ही पैसे देऊ असे म्हणत उज्जत घालून वाद-विवाद सुरू झाला जबर हाण मारीत झाले यामध्ये व्यापाराला जबर मारहाण करत प्राणघातक हल्ला केला.



29 ऑगस्ट शनिवार रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यापाऱ्यावर परभणी येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

किशोर तलरेजा असे जखमी झालेल्या मद्यपेय व्यापाऱ्याचे नाव असून त्यांचे शहरातील वसमत रोडवरील विजय वाईन शॉप या नावाचे दुकान आहे ऑगस्ट रोजी रात्री काही तरुण बेधुंद अवस्थेत दुकानावर मद्य मागण्यासाठी आले व पैशाच्या देण्याघेण्यावरून वाद निर्माण झाला यावेळी किशोर तालरेजा आपल्या दुचाकीवरून घराकडे निघत असताना सदरील तरुणांनी त्यांच्या दुचाकीची चावी हीसकावत त्यांना लोखंडी रॉडने जबर मारहाण करत किशोर तलरेजा यांच्यावर प्राण घातक हल्ला करत त्यांना जखमी केले तलरेजा याच्या डोक्यावर रॉड लागल्यामुळे त्यांचे डोके फुटून त्यावर सात टाके पडले असून उजवा हात फ्रॅक्चर झाला आहे.

# मनपातील 14 अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त; आयुक्त अमोल येडगे यांच्याकडून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागांत प्रदीर्घ काळ सेवा बजावून आज, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सेवानिवृत्त झालेल्या १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. मनपा प्रशासनाच्या वतीने त्यांच्या या उल्लेखनीय व दीर्घ सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मनपाच्या सेवेत कार्यरत असताना या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शहराच्या विकासात आणि नागरिकांना



विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या सेवाभावी कार्यामुळे प्रशासनाच्या कामकाजाला नेहमीच बळ मिळाले असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. आज सेवानिवृत्त झालेल्या प्रमुख अधिकाऱ्यांमध्ये नगररचना विभागाचे उपसंचालक श्री. मनोज हरेंद्र गजे, ड्रेनेज विभागाचे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. अनिलकुमार अण्णासाहेब तनपुरे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. विजय करभारी गोर, आणि पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. वसंत भाये यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आहेत.

सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याबाबत मार्गदर्शन करताना आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, सेवाकाळात ज्या आवडी-निवडी किंवा छंद जोपासता आले नाहीत, आता त्यासाठी पुरेसा वेळ द्यावा आणि कुटुंबीयांसोबत आनंदी जीवन जगावे. तसेच, 'आरोग्य हीच खरी संपत्ती' असल्याचे सांगत त्यांनी सर्वांना दररोज किमान एक तास नियमित चालणे, व्यायाम आणि आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला. सर्व सेवानिवृत्तांचे आयुष्य निरोगी, आनंदी आणि समाधानकारक जावो, अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या. या सत्कार प्रसंगी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी अनिल तनपुरे, सुभाष सावंत आणि मुमताज बेगम यांनी मनोगत व्यक्त करत मनपा सेवेतील आपले अनुभव आणि आठवणी उपस्थितांसमोर मांडल्या. प्रशासनाच्या वतीने सर्व सेवानिवृत्तांचा सत्कार करून त्यांनाभावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अनुसूचित जमाती, आदिवासी तसेच विमुक्त व भटक्या जमातींसाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

हिंदु प्रकास वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** :-मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सर्वसाधारण कार्यक्रम पत्रिका-2026 अन्वये व निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती, परभणी तसेच दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या 'संवाद (SAMVAD)' योजनेंतर्गत अनुसूचित जमाती, आदिवासी तसेच विमुक्त व भटक्या जमातींच्या नागरिकांसाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.




या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश परभणी श्री आर. एम . सादरानी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात ही आदिवासी नृत्य व त्यांच्या कला सादर करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

31 ऑगस्ट हा 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यात येत असून, या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा उद्देश विमुक्त, भटक्या, आदिवासी व अनुसूचित जमातीतील नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची, मोफत विधी सेवा, शासकीय योजना तसेच न्याय मिळविण्याच्या प्रक्रियेबाबत माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा आहे.

सदर कार्यक्रम दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 12.00 ते 2.00 वाजेपर्यंत, दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., परभणी येथे आयोजित करण्यात होता.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. भूषण एम. काळे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी उपस्थित होते. यांनी यांनी उपस्थित आदिवासी बांधव यांना मार्गदर्शन करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी या कार्यालयामार्फत मोफत विधीज्ञ, मोफत सल्ला तसेच इतर सर्व बाबी बाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच संवाद या योजनेबद्दल सविस्तर माहिती सांगितली. उपस्थितांना असे आव्हान केले आहे की, कायदेविषयक कोणतीही अडचण असल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती या कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. व्यंकटेश रा. कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., परभणी हे होते.

कार्यक्रमात मा. श्री. आर. एन. अकुलवार, मुख्य व्यवस्थापक, लीड बँक ऑफिस, परभणी; मा. श्री. विश्वनाथआणा तोंडकर, अध्यक्ष, पर्याय संस्था, कळंब,जि. धाराशिव; मा. श्रीमती जयाताई नेमाणे, जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ, परभणी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# 'आर्टिकल 15' संविधानाची साक्षरता वाढविणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ : डॉ. ऋषिकेश कांबळे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : सध्याच्या काळात आरक्षणाबाबत विविध आक्षेप घेत संभ्रमाचे वातावरण निर्माण केले जात आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. ह. नि. सोनकांबळे लिखित 'आर्टिकल १५' हा ग्रंथ आरक्षणासंदर्भातील अनेक प्रश्नांना संदर्भासह उत्तर देणारा आहे. आरक्षणाची लढाई लढणाऱ्या प्रत्येकाला हा ग्रंथ वैचारिक बळ देणारा असून, संविधानाची साक्षरता वाढविणाऱ्या महत्त्वपूर्ण ग्रंथांपैकी एक असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केले.



नागसेनवन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. ह. नि. सोनकांबळे लिखित 'आर्टिकल १५' या ग्रंथावर विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी उपस्थितांशी संवाद साधत ग्रंथातील विविध पैलूंवर भाष्य केले. लेखक डॉ. ह. नि. सोनकांबळे यांच्या साहित्यिक व वैचारिक योगदानावरही सखोल चर्चा करण्यात आली.

# श्री क्षेत्र नाथ आश्रम वेरुळ येथे श्रीमती पुष्पाताई संदिपान भुमरे यांनी सद्गुरु आक्काताई महाराज यांची घेतली भेट

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी श्री क्षेत्र वेरूळ येथील मच्छिंद्रनाथ आश्रम या ठिकाणी आज श्रीमती पुष्पाताई संदिपान भुमरे पाटील यांनी भेट देऊन

नाथ योगिनी सद्गुरु अक्काताई महाराज यांची आपल्या कुटुंबातील सदस्य सह आशीर्वाद घेतले तीर्थक्षेत्र वेरूळ या ठिकाणी येऊन श्री मच्छिंद्रनाथ भगवंताचे साक्षात दर्शन झाल्याचे माझ्या मनाला वाटले या ठिकाणचे स्वच्छ व सुंदर वातावरण येळगंगा परिसर व आलेल्या सर्व भाविक भक्तांना या ठिकाणी उपलब्ध



असलेल्या सुख सुविधेचे बारिक ने निरीक्षण केले व आश्रमातील कामकाजाच्या बाबतीत सद्गुरु आक्काताई जी महाराज यांच्याशी चर्चा केली यावेळी आश्रमाच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे यांचे यांचे सहाय्यक विलास शिंदे संतोष करपे पाटील विठ्ठल गोम लाडू यांच्यासह भक्तपरिवार चे सदस्य उपस्थित होते

# वेरुळ श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग दर्शनासाठी प्रचंड गर्दी. बंदोबस्तावर असलेल्या जवानांकडून दर्शनासाठी जाणाऱ्या भाविक भक्तांची मागील गेटवर आडवणूक

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी दि ३१ वेरूळ श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाच्य दर्शनासाठी लाखो भाविकांची प्रचंड गर्दी पायी दिंडी व कावड यात्रा. मोठ्या प्रमाणात रविवारी मध्यरात्रीपासून सुरुवात झाली होती भाविकांनी 'हर हर महादेव', 'बम बम भोले'चा जयघोष करत घृष्णेश्वरा १२ वे ज्योतिर्लिंग भगवंताचे दर्शन घेतले.

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरासह. वेरूळ लेणी पाहण्यासाठीही पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती.

मंदिरापासून जोडरस्त्यापर्यंत बॅरिकेड्स लावून दर्शनासाठी रांगेची



व्यवस्था मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती.

गाभाऱ्यातील अभिषेक श्रावणच्या महिनाभर बंद करण्यात आलेली आहे

मंदिर परिसरातील मागील गेट हे दर्शन करून भाविकांना व्यवस्थित बाहेर पडण्यासाठी केलेले आहे त्यासाठी यावर्षी प्रथमच महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्सच्या जवानांची नियुक्ती करण्यात आलेली आहे

व याच गेटने वेरूळ गावा तील नागरिक ठरवून दिलेल्या वेळेत व आलेल्या विशेष व्हीआय पी लोकांसाठी मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी वापरल्या जात आहे

परंतु मंदिर ट्रस्टच्या नियोजन शून्य कारभारामुळे वेरूळ तांडा. येथील नागरिक. तसेच छत्रपती संभाजी नगर . खुलताबाद परिसरातील पत्रकार यांना आत जाण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष किंवा ट्रस्टीशी बोलणं करून द्या जर आपण त्यांच्या ओळखीचे असाल तर आपल्याला सोडण्यात येईल नाश्ता आपल्याला आत जाता येणार नाही अशी भूमिका येथे कार्यरत असलेल्या जवानांनी घेतल्यामुळे अनेक भाविक भक्त वापस गेले व्हीआयपी च्या नावाखाली अनेक भाविक याच गेटने जवानासमोर घुसखोरी करून जाताना दिसत होते

(भारतीय जनता पार्टीचे वेरूळ गटाचे जिल्हा परिषद सदस्य तथा घृष्णेश्वर मंदिर ट्रस्ट संस्थानचे अध्यक्ष कुणाल दांडगे हे कायम नॉट रिचेबल असल्यामुळे या ठिकाणी देशभरातून येणाऱ्या भाविकां भक्तांना येणाऱ्या अडचणी बाबत कोणाशी संपर्क करा हा प्रश्न आहे)

भाविकांच्या सुरक्षेसाठी मंदिर परिसरात सीसीटीव्ही, छुपे कॅमेरे, खासगी सुरक्षारक्षक तसेच पोलिस कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य निभवत

# कन्नडच्या प्रभारी गट शिक्षण अधिकाऱ्यांवर एकतर्फी निलंबनाची कारवाई; शिक्षक वर्गात तीव्र असंतोष

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

कन्नड येथील प्रभारी गट शिक्षण अधिकारी मोहम्मद सबाहत नैमोद्दीन यांच्यावर नुकतीच प्रशासनाकडून एकतर्फी व अन्यायकारक निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. गणवेश निधी न वाटणे आणि 'पीएम श्री' शाळेचा निधी परत जाणे या कारणांवरून ही कारवाई करण्यात आली असून, याविरोधात 'महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती' आक्रमक झाली आहे. या मनमानी कारभारामुळे शिक्षक वर्गात तीव्र संताप व असंतोष उसळला आहे. आपल्या ११ महिन्यांच्या सेवाकाळात अत्यंत पारदर्शक आणि कर्तव्यदक्षपणे काम केले आहे. या संपूर्ण कालावधीत त्यांच्याविरोधात एकाही शिक्षकाने किंवा लोकप्रतिनिधीने कोणतीही तक्रार केलेली नाही. मात्र, प्रशासनाने वास्तव्य व सत्यता पडताळून न पाहताच अत्यंत घाईघाईने ही निलंबनाची कारवाई केल्याचा गंभीर आरोप



समितीने केला आहे. संबंधित निधी वितरित न होण्यामागील तांत्रिक बाबी लपवून प्रशासनाने बळीचा बकरा शोधल्याचे स्पष्ट होत आहे. शासनाकडूनच गणवेश निधीचा हप्ता वेळेवर न मिळता तो परत मागवण्यात आला होता, त्यामुळे यात गट शिक्षण अधिकाऱ्यांचा कोणताही वैयक्तिक दोष नव्हता. तसेच, नियमानुसार 'पीएम श्री' शाळांच्या निधी खर्चाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीची असते. असे असताना या प्रकरणी गट शिक्षण अधिकाऱ्यांना थेट जबाबदार धरून केलेली कारवाई पूर्णपणे चुकीची असल्याचे शिक्षक नेत्यांचे म्हणणे आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात २०२३ ते २०२६ या तीन वर्षांच्या कालावधीत सूडबुद्धीने कारभार चालवल्याचा आरोप होत आहे. बदल्यांमधील त्रुटी, पदोन्नतीमधील तफावती आणि सोयीच्या ठिकाणी मनमानी पोस्टिंग देण्याच्या धोरणाविरोधात आवाज उठवणाऱ्या तब्बल ५० हून अधिक शिक्षकांना यापूर्वी आकसपोटी निलंबित करण्यात आले होते. हा हुकूमशाही कारभार आजही सुरूच असून, एका प्रामाणिक अधिकाऱ्याला बळी देऊन प्रशासकीय अपयश झाकण्याचा हा प्रयत्न असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

मोहम्मद सबाहत नैमोद्दीन यांच्यावर केलेली ही अन्यायकारक निलंबनाची कारवाई त्वरित रद्द करून त्यांना सन्मानाने पूर्ववत सेवेत घेण्यात यावे, अशी ठाम मागणी महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीने केली आहे. अन्यथा, जिल्हा परिषदेच्या या मनमानी कारभाराविरोधात जिल्ह्यातील सर्व शिक्षक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा दिला आहे.

या निवेदनावर दिलीप ढाकणे, बाबूलाल राठोड, संतोष देवरे, मनोहर पट्टे, किशोर पवार, जगन सोनावने, प्रकाश मुंडे, शेख अब्दुल रहीम, प्रदीपकुमार नरवडे आणि शिवाजी एरंडे आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911